## स्पे. दि. दा. क्र. ३२/२००७ मधील नि. क्र. १०९ खालील आदेश
CNR : MHSN050014452007

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १/अ ने तिच्याविरुद्ध झालेला 'विना कैफियत चौकशीचा' आदेश रद्द होवून मिळण्यासाठी सादर केला आहे.

२. प्रतिवादी क्र. १ चे म्हणणे असे की, दि. २२.१२.२०१७ रोजी प्रतिवादी या कामी वकीलामार्फत हजर राहिली. परंतु त्यानंतर तिला धार्मिक कार्यामुळे बरेच दिवस बाहेरगावी रहावे लागले. त्यामुळे तिला या कामी कैफियत देण्यासाठी आवश्यक असलेले कागद व माहिती वकीलांना वेळेत देता आली नाही. त्यामुळे प्रतिवादीविरुद्ध दि. ३१.०१.२०१८ रोजी विना कैफियत चौकशीचा आदेश पारित झाला आहे. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी दिलेली कैफियत प्रस्तुत प्रतिवादी स्विकारु इच्छिते. त्यामुळे तिच्याविरुद्ध झालेला आदेश रद्द होणे आवश्यक आहे. म्हणून प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. वादीने अर्जास विरोध करुन त्याचे म्हणणे निशाणी ११४ ला दिले आहे. वादीने अर्जातील मजकुर नाकारला आहे. वादीचे म्हणणे असे की, प्रतिवादी क्र. १/अ व अन्य प्रतिवादींचे संगनमत आहे. इतर प्रतिवादींनी प्रतिवादी क्र. १/अ चा नोकरीचा पत्ता देण्यास टाळाटाळ केलेली होती. त्यामुळे अर्जात नमुद केलेले कारण योग्य व सबळ नाही. सबब अर्ज नामंजुर करण्यात यावा. यदाकदाचित अर्ज मंजुर करावयाचा झाल्यास रु.१,०००/– खर्च मिळावा.

४. दोन्ही वकील गैरहजर. त्यामुळे युक्तीवाद नाही.

५. अभिलेख पाहिला. वादीने जरीही अर्जात नमुद केलेले कारण योग्य व सबळ नाही, या कारणाकरीता अर्जास विरोध केला असला तरी प्रतिवादी क्र.

१/अ ने अर्जासोबत प्रतिज्ञापत्र दिलेले आहे, ज्यामध्ये तिने अर्जातील मजकुराची पुनरावृत्ती केली आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १/अ च्या शपथेवरील कथनावर अविश्वास दाखविता येणार नाही. शिवाय प्रतिवादी क्र. १/अ ने या अर्जासोबत पुरसीस देवून प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी पूर्वी दिलेली कैफियत अंगीकारली आहे. यावरुन प्रतिवादीला वेगळी कैफियत द्यावयाची नाही, हे स्पष्ट होते. दाव्याचे स्वरुप, प्रतिवादींच्याविरुद्ध वादीने केलेली मागणी लक्षात घेता, प्रतिवादी क्र. १/अ ला तिची बाजू न्यायालयासमोर मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. त्यामुळे तिच्याविरुद्ध झालेला आदेश रद्द करणे आवश्यक आहे.

६. वादीने जरीही खर्च मागितला असला तरी, वर नमुद केल्याप्रमाणे, प्रतिवादी क्र. १/अ या वेगळी कैफियत देवू इच्छित नाहीत. उलट प्रस्तुतच्या अर्जासोबत तिने पूर्वी दिलेली कैफियत अंगीकारल्याची पुरसीस दिली आहे. अशा परिस्थितीत केवळ प्रतिवादींनी वेळेत पुरसीस दिली नाही, म्हणून तिचेविरुद्ध खर्चाचा आदेश करणे योग्य होणार नाही.

७. वरील विवेचनावरुन अर्ज मंजुर करावा लागेल. म्हणून पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## **आदेश**

अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

प्रतिवादी क्र. १/अ विरुद्ध झालेला 'विना कैफियत चौकशीचा' आदेश रद्द करण्यात येत आहे.

सही/–

इस्लामपूर. (श्रीमती सु. रा. पाटील)

दिनांक–१९.०६.२०१८ दिवाणी न्यायाधीश व. स्तर, इस्लामपूर